# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र

नॅक समिती तर्फे बी+ दर्जा प्राप्त

कार्यालय दूरध्वनी : (०२४०)२४०३३५४
E-mail : neerajsalunkhe@yahoo.com
Fax : (0240) 2403335

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद-४३१ ००४
(महाराष्ट्र)

संदर्भ क्र./ csmsc/२०१०/ दिनांक- ३०/०८/२०१०

**प्रति,**
**मा.संचालक,**
**महाविद्यालये व विद्यापीठ**
**विकास मंडळ,**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय :- छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचा स्थापनेपासून ते आल्तापर्यंतचा प्रगती अहवाल.
संदर्भ :-नॅक/२०१०-११/३४२८-३४३५ दिनांक २०/२४-०८-२०१०.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचा स्थापनेपासून ते आल्तापर्यंतचा प्रगती अहवाल सादर करत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे सन २००८-२०१० या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. हे कार्यक्रम घेण्यापाठीमागे शिवाजी महाराज व एकंदरीतच मराठा इतिहासाच्या बाबतीत नवनवीन संशोधन करणे व नवे संशोधन समोर आणने हा उद्देश आहे.

## २००८-२००९



१) दि.२७ जानेवारी २००९ ते १९ फेब्रुवारी २००९ या काळात मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी पुणे विद्यापीठातील निवृत्त मोडी तज्ज्ञ डॉ.एम.आर.कुलकर्णी यांना आमंत्रित केले होते. ८९ विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.शिवकालाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकास मोडी लिपीचे ज्ञान असल्यास खूप उपयुक्त ठरते.



Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net



२) इतिहास लेखनासाठी त्या-त्या काळातील वापरलेल्या वस्तु, शस्त्रे उपयोगी असतात, त्या काळातील लढाया व लढाईचे तंत्र कसे होते याचा अंदाज आपणास येतो . मध्ययुगीन काळाच्या इतिहास लेखनामध्ये मध्ययुगीन काळातील शस्त्रे महत्त्वाची ठरतात त्यासाठी दि. १३ ते १६ फेब्रुवारी २००९ रोजी 'इतिहासाचे साक्षीदार' हे शस्त्र प्रदर्शन विद्यार्थी कल्याण विभागाच्या सहाय्याने घेण्यात आले. या प्रदर्शनात, भाले, पट्‌टा, दांड पट्‌टा, तलवारी, राज्यस्थानी तलवार, फिरंगी तलवार, कुऱ्हाडी, कुलुप, ढाल, वाघनखे, चिलखत, तीर कांमटा, हरणाची शिंग, कट्‌यार, तोफगोळे, खंजिर इत्यादी शस्त्रास्त्रे ठेवली होती. या शस्त्रांचे संग्राहक गिरीश जाधव व त्यांचे सहकारी पवनकुमार निप्पणिकर यांनी सतत चार दिवस मार्गदर्शन केले. या प्रदर्शनाचा लाभ सुमारे २००० विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक व इतिहास प्रेमींनी घेतला.

३) दि. १९ फेब्रुवारी २००९ रोजी डॉ.अब्दुल गनी इमारतवाले, विजापूर यांचे शिवजयंती निमित्त 'शहाजी राजे, शिवाजी राजे आणि मराठा राज्याची स्थापना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.ए.जी.खान (प्रभारी कुलगुरु) होते.



४) दि. २०,२१ फेब्रुवारी २००९ रोजी Rewriting History of Chhatrapati. Shivaji या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन सकाळी ११ वाजता सुप्रसिद्ध इतिहास तज्ज्ञ डॉ.जयसिंगराव पवार (कोल्हापूर) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक मुळे (कुलसचिव) उपस्थित होते व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. ए.जी. खान (प्रभारी कुलगुरु) यांनी भुषविले.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना डॉ.जयसिंगराव पवार म्हणाले की, ''आजपर्यंत लिहिला गेलेला इतिहास हा उपलब्ध साधनांच्या आधारे लिहीला गेला. पण इतिहास लेखन प्रवाहामध्ये नवनविन साधने, पुरावे मिळत जातात व त्यावरुन इतिहास नव्याने समोर येतो आणि कुठलाही इतिहासकार असा दावा करु शकत नाही की मी केलेले इतिहास लेखन हे अंतिम आहे. त्यामुळे शिवशाहीच्या इतिहासाची पुनर्मांडणी करणे आवयक आहे.''



दुपारचे सत्र इतिहास वस्तुसंग्रहालयामध्ये आयोजित करण्यात आले. यामध्ये पहिल्या सत्राचा विषय-



**Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net**

शिवशाही व संस्कृत साधने होता. या सत्राचे अध्यक्ष डॉ.सदाशिव शिवदे होते. वृषाली भोसले यांनी 'शिवभारत्‌मचे ऐतिहासिक महत्त्व' या निबंधाचे वाचन केले तर डॉ. शिवदे यांनी संस्कृत साधनातून शिवशाहीचा सामाजिक इतिहास या विषयावर निबंध वाचन करुन संस्कृत साधनांचे शिवशाहीच्या इतिहास लेखनांच्या पुनर्मांडणीतील महत्त्व स्पष्ट केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात 'शिवशाही व साधने' या विषयी चर्चा करण्यात आली. डॉ.प्रल्हाद लुलेकर हे या सत्राचे अध्यक्ष होते. डॉ. अब्दुल गनी इमारतवाले यांनी Maratha History in Medieval and early Modern Persian Sources. या विषयावर शोध निबंधाचे वाचन केले. डॉ. आर.एच.किल्लेदार यांनी History of Shivaji in bosateenus Salateen. या निबंधाचे वाचन केले. प्रा. लहू गायकवाड यांनी पुणे येथील अभिलेखागारामध्ये अनेक प्रकारची कागदपत्रे कुठे-कुठे उपलब्ध आहेत याचे स्मरण करुन दिले.

तिसऱ्या सत्रात एम.एन.जोशी यांनी शिवाजीची सैन्यसंख्या १६५९-६० व त्याचे महत्त्व सांगणारा शोधनिबंध सादर केला. डॉ. उमेश कदम यांनी History of the Marathas the French Connection. या शोधनिबंधाचे वाचन केले. यामध्ये त्यांनी प्रतिपादन केली की, इंग्रजाआधी फ्रेंचानी भारतावर किंवा जगावर साम्राज्य स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले होते.

दि.२१-२-२००९ रोजी चौथे सत्र शिवशाही व परकिय या विषयावर प्रा. भाऊसाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाले. प्रा. डॉ. अशोक राजेशिर्के यांनी Portuguese-Shivaji relations 1647-1680 या विषयावर तर नीता खांडपेकर यांनी Shivaji's Relations with English and Dutch in Konkan या विषयावर आणि नीलांबरी जगताप यांनी Rajapur the changing four tunes of a part town. या विषयावर शोधनिबंध सादर केले.



पाचवे सत्र 'शिवशाहीच्या इतिहासाची पुनर्मांडणी' हे होते. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ.रामकृष्ण सोळुंके होते. या विषयावर श्रीमंत कोकाटे यांनी विस्तृत विवेचन केले. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त इयत्ता चौथीच्या पुस्तकातील शिवरायांच्या विषयी असलेल्या लेखनावरील आक्षेपांची मांडणी केली आणि शिवरायांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणे आवश्यक आहे असे मत मांडले.



सहावे सत्र शिवशाही व भूगोल हे होते. तर सातव्या सत्राची सुरवात डॉ.उमेश बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. शिवशाही व सामाजिक परिस्थिती या विषयावर. सौ.पुष्पा गायकवाड आंबेडकरवादी इतिहास लिखाणाच्या दृष्टीकोनातून शेजवलकरांच्या शिवशाही विषयक लिखाणाची चिकित्साम डॉ. अनिल शिंगारे, डॉ.सोपान शेंडे, शेख मुसाक, उमाकांत सुर्यवंशी यांनी शोध निबंधाचे वाचन केले.


Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net

या राष्ट्रीय चर्चासत्रात एकूण २६ शोध निबंध सादर झाले तर ९० इतिहास संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक या चर्चासत्रास उपस्थित होते. या दोन दिवसीय चर्चासत्राचा समारोप डॉ. उमेश बगाडे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे डॉ.अशोक चव्हाण (मा. परिक्षा नियंत्रक) आणि छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ.नीरज साळुंखे यांच्या उपस्थितीत पार पडला.

## २००९-२०१०

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.हे कार्यक्रम आयोजन करण्यामागे शिवाजी महाराज व एकंदरीतच मराठा इतिहासाच्या बाबतीत नवनवीन संशोधन करणे व नवे संशोधन समोर आणने हा उद्देश आहे.

**५)** छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने या शैक्षणिक वर्षामध्ये ***"Geographic Details of Empire of Chh. Shivaji Maharaj"*** हा संशोधन प्रकल्प सुरु करण्यात आला. २०१०-११ मध्ये सदर प्रकल्प चालु आहे. या संशोधन प्रकल्पासाठी श्री.डक कामाजी रामजी या विद्यार्थ्याची संशोधक सहाय्यक म्हणुन नेमणूक करण्यात आली आहे. या संशोधन प्रकल्पावर काम करत असताना पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाला भेट देण्यात आली. संशोधक प्रकल्पासाठी लागणा-या काही ग्रंथाची खरेदी देखील करण्यात आली. तसेच या शैक्षणिक वर्षामध्ये विविध ज्ञानविस्तार, रामदास व रामदासी साहित्य , निबंधमाला व इतर काही दुर्मिळ पुस्तकाची छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भाने जे काही लिखाण झाले होते अशा लेखांचे छायाचित्र काढुन ते एकत्र डी.व्ही.डी. मध्ये संग्रहीत करण्यात आले.

६) दिनांक १९/०२/२०१० छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त डॉ, टी.एस. पाटील यांचे ''धर्म निरपेक्ष व लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती ''या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या विषयावर बोलताना शिवरायांच्या विचारातून प्रेरणा घेतल्यास ''भारत महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही''. असे प्रतिपादन डॉ, टी.एस. पाटील यांनी केले. पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, समाजातील सर्वच जातीना अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष उभा करण्याचे मनोरथ देणारा छत्रपती शिवाजी राजा पहिला धर्मनिरपेक्ष कल्याणकारी राजा होता.सर्वसामान्य माणुस उभा केला पाहिजे,हे शिवरायांच्या लक्षात आले.म्हणून त्यांनी सह्याद्रीच्या कडेकपा-यातील पोरं जमा केली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.कुलगुरु डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ,नीरज साळुंखे यांनी केले.



७) दिनांक १९,२० फेब्रु. २०१० ''सतरावे शतक व शिवाजी महाराज'' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन दुपारी २ वाजता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर येथील हिंदी विषयाचे निवृत्त प्राध्यापक व शिवइतिहास तज्ज्ञ डॉ. वसंतराव मोरे यांच्या हस्ते झाले प्रमुख पाहुणे डॉ.दीपक मुळे (मा.कुलसचिव) उपस्थित होते व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ कल्याण लघाणे (व्यवस्थापन परिषद सदस्य) यांनी भुषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.नीरज साळुंखे यांनी तर सुत्र संचलन श्री.विकास कुमार यांनी केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना डॉ.वसंतराव मोरे म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दैदीप्यमान व क्रांतीकारी आहे.सतराव्या शतकात हा लोककल्याणकारी राजा सर्वच क्षेत्रात पारंगत होता.युध्दनीती व अद्यावत शस्त्राची निर्मिती करुन त्यांनी सर्वसामान्यासाठी राज्य चालवले. शिवरायांची अखंड हिंदवी स्वराज्यांची संकल्पना आपण अमलात आणली पाहिजे.छत्रपती शिवरायांनी अन्याय अत्याचार करणा-याची राजवट उलथून टाकित हिंदवी स्वराज्यांची स्थापना केली.विविध संस्थाने व राज्यांत वाटल्या गेलेल्या देशात अखंड


Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net

भारताची संकल्पनाही शिवरायांनी रुजविली असे प्रतिपादन इतिहासाचे गाढे अभ्यासक वसंतराव मोरे यांनी केले.

दुपारी ४ वाजता पहिल्या सत्राला सुरुवात झाली .या पहिल्या सत्राचा विषय **''छत्रपती शिवाजी महाराज व सतरावे शतक''**



होता. या सत्राच्या अध्यक्षा पुष्पा गायकवाड होत्या. या सत्रात डॉ. सदाशिव शिवदे यांनी 'शिवचरित्राच्या एका नव्या साधन ग्रंथाचा शोध-प्रतापदुर्गामाहात्म्य'या शोधनिंबंधाचे वाचन केले. डॉ. उमेश कदम, श्री. किरण जाधव, यांनी शोध निबंध वाचन केले.



दिनांक २०-०२-२०१० रोजी दुसरे सत्र डॉ.सदाशिव शिवदे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाले.सतराव्या 'शतकातील शस्त्रास्त्र यांचे एकत्रीकरण' ''(ARMS IN MEDIEVAL INDIA)'' या विषयावर डॉ.गिरिश जाधव यांनी आपला विशेष शोध निबंध वाचला.त्यानी सुरुवातीला शस्त्रास्त्र यांची माहीती दिली व नंतर ते कसे वापरत होते,तलवारी पकडण्याच्या वेगवेगळया पध्दती याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले उपस्थित सभागृहातील इतिहास प्रेमी प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्याना प्रतिसाद दिला.

तिसरे सत्र 'छत्रपती शिवाजी महाराज आणि राजकीय संबध'या विषयावर होते या सत्राचे



अध्यक्ष डॉ.राजेंद्र भामरे हे होते. डॉ, इमारतवाले यांनी ''The Maratha Nobility&Bijapur'' या विषयावर आपला शोध निबंध सादर केला.डॉ.आर.एच.किल्लेदार यांनी ''Prominent Historians of Bijapur Court'' या विषयावर आपला पेपर वाचला. डॉ.झेड. ए. पठाण यांनी '' शिवाजी राजे व सिददी



संबंध '' हा शोध निबंध वाचला. श्री.प्रभाकर गद्दे यांनी 'निंबाळकर आणि त्याचे वंशज' हा शोध निबंध वाचला. श्री.डक कामाजी यांनी ''शाहाजी महाराजांनी केलेला स्वातंत्र्याचा पहिला प्रयत्न'' या विषयावर आपला शोध निबंध वाचला.श्री.संतोष देवराय यांनी स्फूर्तीचा झरा:छ.शिवाजी महाराज हा लेख वाचला.



Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net

चौथे सत्र 'सतराव्या शतकातील अर्थव्यवस्था'असे होते.या सत्राचे अध्यक्ष डॉ.सुनिल नरवाडे हे होते. या सत्रात डॉ.अशोक राजेशिर्के यांनी ''Markets and merchants in the 17th Century Maharashtra: an Observation'' या विषयावर आपला शोध निबंध वाचला. डॉ.सर्जेराव भामरे यांनी ''छत्रपती शिवाजी महाराजाचे व्यापार व चलन संबंधीचे धोरण'''या विषयावर आपला शोध निबंध वाचला. डॉ.राजेंद्र धाये यांनी ''छत्रपती शिवाजी महाराजांचे सतराव्या शतकातील कृषी विषयक धोरण'' या विषयावर आपला शोध निबंध वाचला. डॉ.आर .पी भामरे यांनी सतराव्या शतकातील कृषक प्रधान व्यवस्था या विषयावर आपला शोध निबंध वाचला.



पाचवे सत्र छत्रपती शिवाजी महाराज, समाज, स्मारके आणि इतर असे होते.या सत्राचे अध्यक्ष अब्बदुल गनी इमारतवाले हे होते.या सत्रात सौ. पुष्पा गायकवाड यांनी ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामाजिक संघर्षाचे ऐतिहासिक विश्लेषन'' या विषयावर आपला शोध निबंध वाचला.डॉ. बाळासाहेब केंदळे यांनी ''Vatan''at village and PARGANA Level and Political Economy of Seventeenth Century Maharashtra'' या विषयावर आपला शोध निबंध वाचला. डॉ.सुरेश मिश्रा, श्री.सतिश कदम यांनी देखील शोध निबंध वाचन केले.




या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप डॉ.सुरेश गायकवाड (संचालक विद्यार्थी कल्याण विभाग) यांच्या अध्यक्षेखाली पार पडला. या समारोपाचे अध्यक्ष जम्मु विद्यापीठाचे डॉ.जिगर मोहम्मद हे होते. या दोन दिवसीय परिषदेचे सूत्र संचालन श्री. विकास कुमार यांनी केले तर परिषदेला आलेल्या सर्व इतिहास संशोधकाचे आभार छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. नीरज साळुंखे यांनी मानले.

या राष्ट्रीय परिषदेला इतिहासाच्या संशोधकांनी एकूण ५० शोध निबंध पाठविले होते. या शोध निबंधापैकी काही शोध निबंध हे वगळण्यात आले तर काही फक्त कार्यक्रमपत्रिकेत समाविष्ट करण्यात आले. ज्या संशोधकांनी मेहनत घेऊन दर्जेदार शोध निबंध लिहिला अशाच संशोधकाला त्यांचा शोध निबंध वाचण्यासाठी वेळ देण्यात आला. या परिषदेला संपूर्ण भारतातुन २०० इतिहास संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## २०१०-११

८) छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने २०१०-११ या शैक्षणिक वर्षात'' Certificate Course in Modi Studies'' हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.या अभ्यासक्रमाला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळालेली आहे.या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधर असणे आवश्यक आहे. तसेच इतिहास प्रेमी, महाविद्यालयातील इतिहासाचे प्राध्यापक, विद्यार्थी, मध्ययुगातील मराठा इतिहासावर आवड आसणा-या सर्वांना या अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात येईल.हा अभ्यासक्रम सत्र पध्दतीने असेल, त्यासाठी १२०० रु फी ठेवण्यात आली. सदरील अभ्यासकमास ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून त्यांचे वर्ग नियमितपणे चालू आहेत.


Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net

९) दिनांक १८,१९ फेब्रु.२०११ला "Shivaji & his times" या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

१०) मोडी लिपी व फार्सी, अरबी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी अनुदान मिळण्यासाठी मा.सचिव सांस्कृतिक मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

११) आमदार सतिश चव्हाण यांनी मा. मुख्यमंत्र्याना भेटुन मोडी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला अनुदान मिळण्यासाठी पाठपुरावा केला व मा. मुख्यमुत्र्यांनी देखील याचा सकारात्मक विचार करुन अनुदान देण्याचे आश्वासन दिले आहे.

१२) नीरज साळुंखे यांनी बालभारतीच्या 'शिवछत्रपती' या इ.चौथीच्या पुस्तकाच्या लिखाणासाठीच्या समितीवर सदस्य म्हणून काम केले.

आपला विश्वासू

**(डॉ. नीरज साळुंखे )**
**संचालक**
छत्रपती शिवाजी महाराज
अध्यासन केंद्र



**Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- neerajsalunkhe@yahoo.com, Fax: 0240-2403335. www.bamu.net**